NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

**करणसिंह राजेंद्र पाटील** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश** :

भारतीय संविधानाने संघराज्य व्यवस्थेद्वारे केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये अधिकारांची विभागणी करून दिलेली आहे. देशातील विविध प्रदेशांचा कारभार पाहण्यासाठी घटक राज्य सरकार व सर्व प्रदेशांचा एकत्रित कारभार पाहण्यासाठी मध्यवर्ती केंद्र सरकार अशी व्यवस्था संघराज्यात आहे. मात्र संघराज्य व्यवस्थेत अनेक आव्हाने देखील आहेत.

केंद्रात व विविध राज्यात भिन्न पक्षांची सत्ता असते त्यावेळी तणाव निर्माण होतात. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांना केंद्र सरकारकडून दुटप्पी वागणूक दिली जाते. पक्षांतर बंदी कायद्याचा गैरवापर करून राज्यसरकारे अस्थिर केली जातात. केंद्रसरकारच्या राज्यातील वाढत्या हस्तक्षेपामुळे राज्यांची स्वायत्तता घटत चालली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व दिले जात असल्याने मोठी तफावत निर्माण होते. लोकसंख्या नियंत्रणात ठेवलेल्या राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळत असल्याने त्यांच्यामध्ये असंतोष वाढीस लागला आहे. तसेच आर्थिक धोरणात केंद्रांचे वर्चस्व वाढत आहे. अनेकवेळा राज्यांना आर्थिक मदतीसाठी केंद्रावर अवलंबून रहावे लागते. विकासकामांसाठी राज्यांना निधी देताना राजकीय पक्षपातीपणा केला जातो. ज्या राज्यात केंद्र विरोधी सरकारे आहेत तेथे केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप अनेक राज्ये करत आहेत. केंद्र व राज्यात वेगळ्या पक्षांची सरकारे आहेत तेथे राज्यपाल व राज्य सरकार यांच्यात वारंवार संघर्ष होऊ लागले आहेत. संघराज्यासमोर प्रादेशिक अस्मिता, प्रादेशिक असमतोल आदी आव्हानेही न संपणारी आहेत. अनेक ठिकाणी आंतर-राज्य वादही आहेत. कायदे निर्मितीत केंद्र सरकार वर्चस्वशाली आहे त्याचा फटका राज्यांना बसतो. एक राष्ट्र, एक निवडणूक या विधेयकामुळे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. अशी अनेक आव्हाने सध्याच्या परिस्थितीत भारतीय संघराज्य व्यवस्थेपुढे आहेत.

**प्रस्तावना :**

देशातील केंद्र सरकार आणि घटक राज्यांमधील राज्य सरकारे यांच्यामध्ये संविधानाने अधिकारांची विभागणी करून दिलेली जी व्यवस्था असते त्यास संघराज्य असे म्हणतात. सरकार प्रादेशिक अर्थाने लोकांच्या जवळ असेल तर ते लोकांच्या नियंत्रणात राहण्याची शक्यता जास्त असते, या अपेक्षेतून ही संघराज्य व्यवस्था उदयास आली. म्हणून संपूर्ण देशासाठी एकच सरकार निर्माण करण्याऐवजी देशातील विविध प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी घटक राज्य सरकारे आणि सर्व प्रदेशांचा एकत्रित कारभार पाहण्यासाठी मध्यवर्ती असे केंद्र सरकार अशी व्यवस्था संघराज्यात केलेली असते. भिन्न प्रदेशांचे स्वतंत्र अस्तित्त्व असणाऱ्या अमेरिकेमध्ये संविधानाने १७८९ ला संघराज्य व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे संघराज्य या सैद्धांतिक मांडणीवर दीर्घकाळ अमेरिकेच्या प्रारुपाचा प्रभाव राहिला. परंतु विसाव्या शतकामध्ये अनेक देशांनी संघराज्य पद्धत स्विकारली त्यापैकी बहुतांश देशांनी अमेरिकन संघराज्य पद्धत जशीच्या तशी न स्वीकारता आपल्या सोयीने त्यात बदल करून स्विकारली. अमेरिका आणि भारत यांची संघराज्य बनण्याची प्रक्रिया मूलत: वेगळी होती कारण भिन्न आणि स्वतंत्र प्रदेशांनी एकत्र येण्याच्या प्रयत्नातून अमेरिका संघराज्य बनली तर भारत संघराज्य बनला तो भिन्न प्रदेशांनी एकत्र राहण्याच्या म्हणजेच ऐक्य टिकविण्याच्या प्रेरणेतून. यावरूनच असे लक्षात येते की ऐक्य टिकवणे हे जर संघराज्याचे उद्दिष्ट असेल तर त्यासाठी सुसंगत अशा तरतुदी आणि तसे व्यवहार विकसित करणे म्हणजे संघराज्याची जडणघडण करणे होय.

संघराज्याची निर्मिती कशी होते त्यावरून त्याच्या केंद्रोत्सारी व केंद्रोत्कर्षी या दोन पद्धती विशद केल्या जातात. त्यापैकी भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी पद्धतीने उदयास आले आहे. तसेच संघराज्य व्यवस्था असणाऱ्या प्रत्येक देशातील संघराज्य व्यवस्थेमध्ये सारखेपणा दिसत नाही तर परिस्थितीनुरूप विभिन्नता दिसून येते. त्यासाठी त्या देशाची राज्यघटना लिखित व परिदृढ स्वरुपाची असते तसेच स्वतंत्र असे न्यायव्यवस्थेचे अस्तित्त्व असते. काही संघराज्यामध्ये दुहेरी नागरिकत्व आहे तर भारतामध्ये मात्र एकेरी नागरिकत्व आहे. भारतीय राज्यघटनेतील भाग १ मधील कलम १ ते कलम ४ ही संघ आणि त्याचे क्षेत्र यांच्याशी निगडीत आहेत. तसेच कलम १ मध्ये संविधान निर्माणकर्त्यांनी 'संघराज्य' या शब्दाचा उल्लेख न करता इंडिया म्हणजेच भारत हा राज्यांचा संघ असेल असे म्हटलेले आहे. यातून असे दिसून येते की भारत हा एकच अविभाज्य घटक असून राज्यांचे संघटन देशाच्या एकात्मतेवर भर देते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्य ही संकल्पना न स्विकारता 'राज्यांचा संघ' ही संकल्पना स्विकारण्यामागील दोन कारणे सांगितली होती. एक म्हणजे अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे भारत हा राज्यांतील करारानुसार बनलेला नाही आणि दुसरे भारतात राज्यांना संघराज्यापासून वेगळे होण्याचा अधिकार नाही. राज्ये ही संघराज्य प्रणालीची सदस्य असतात आणि केंद्रासोबत अधिकार विभागून घेतात तर केंद्रशासित प्रदेश व इतर परकीय मिळवलेली क्षेत्रे यांच्यावर केंद्र सरकारचा अंमल राहतो. तसेच राज्यांच्या सहमतीशिवाय नवीन राज्ये निर्माण करण्याचा, सध्याच्या राज्यांची क्षेत्रे, सीमा व नाव बदलण्याचा सर्वस्वी अधिकार घटनेने संसदेला दिला आहे. याचाच अर्थ असा होतो की संसद आपल्या इच्छेप्रमाणे भारताचा राजकीय नकाशा नव्याने बनवू शकते. त्यामुळे एखाद्या राज्याची क्षेत्रीय अखंडता किंवा अस्तित्वाची घटनेने हमी दिलेली नाही. त्यामुळे भारत हा विनाशकारी राज्यांचा अविनाशी संघ आहे असे आंबेडकरांनी वर्णन केलेले आहे. संघराज्यवाद हा संविधानाच्या मूलभूत रचनेतील एक आधारस्तंभ आहे.

संघराज्य सिद्धांतकार के.सी.व्हेअर यांनी भारतामध्ये एकात्म तसेच संघराज्यीय असे दोन्ही वैशिष्ट्य आढळते म्हणून त्यास अर्ध संघराज्य असे संबोधले आहे. त्यांचा हा युक्तिवाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या काळ आणि परिस्थितीच्या गरजेनुसार आपले संविधान एकात्म तसेच संघराज्यीय असेल या म्हणण्याबरोबर सुसंगत दिसून येते. भारतीय संविधानाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर देखील संघराज्य व्यवस्थेबाबतची निश्चित एक अशी भूमिका सांगता येत नाही कारण स्वातंत्र्यानंतरच्या काळात संघ राज्याचे एकात्म स्वरूप असल्याचे दिसते त्यानंतर काँग्रेस व्यवस्थेमध्ये त्याचे स्वरूप सहकारी संघराज्याचे होते तसेच त्या कालावधीत दुहेरी संघराज्याचे अस्तित्व देखील केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या अधिकारांमध्ये असलेल्या स्पष्ट व वेगळ्या विभागणीवरून दिसते. काँग्रेस व्यवस्थेच्या ऱ्हासानंतर मात्र केंद्र व राज्यांमध्ये सत्तेवर असणाऱ्या विरोधी पक्षांच्या सरकारमध्ये स्पर्धात्मक संघराज्याचे स्वरूप दिसून येते. १९९० नंतरच्या आघाडी सरकारच्या काळामध्ये चित्र पालटत गेले कारण कोणत्याही पक्षाला बहुमत नसल्याने वाटाघाटीचे संघराज्य आकार घेत गेले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

२) संघराज्यातील केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

३) संघराज्यामधील वित्तीय धोरणांचा आढावा घेणे.

४) राज्यपालांची संघराज्यातील भूमिका अभ्यासणे.

५) संघराज्यापुढील प्रादेशिक आव्हानांचा अभ्यास करणे.

६) राज्यां-राज्यांमधील ध्रुवीकरणाचा संघराज्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच माहितीचे तुलनात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण केले आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र तसेच संकेतस्थळ यांचा समावेश आहे.

**भारतीय संघराज्यापुढील आव्हाने :**

भारतीय संविधान काही एकात्मक वैशिष्टांसह संघराज्यीय व्यवस्था स्थापन करते त्यामुळे भारतीय संघराज्य अद्वितीय आहे. तसेच ब्रिटिश राजवटीतील एकात्मक व्यवस्थेपासून स्वातंत्र्यानंतर संघराज्यीय व्यवस्थेत झालेला विकास होय. भारतीय संघराज्याला कालांतराने अनेक आव्हाने आणि समस्यांना सामोरे जावे लागले. जसे की संस्थानांचे एकीकरण, राज्यांची भाषिक पुनर्रचना, प्रादेशिक चळवळी, राज्यांच्या स्वायत्ततेच्या मागण्या यापासून ते समकालीन केंद्र-राज्य संबंधातील संघर्ष, आर्थिक विषमता, राजकीय व प्रशासकीय आव्हाने, सामाजिक तेढ, प्रादेशिक असमानता आणि न्यायिक आव्हाने होय.

राजकीय आव्हाने :-

केंद्र व राज्य यामध्ये भिन्न पक्षांची सत्ता :

राजकीय परिस्थितीनुसार संघराज्याचे स्वरूप अनेकदा बदलत असते. जेव्हा एकाच राजकीय पक्षाची सत्ता केंद्र व राज्यामध्ये असते तेव्हा त्यामध्ये दोन्ही स्तरावरती सहकार्य प्रस्थापित होते. मात्र याउलट विरोधी राजकीय पक्ष सत्तेत

असल्यामुळे अनेकदा तणाव निर्माण झाल्याचे दिसत आहे. तसेच विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या राज्य सरकारांना केंद्र सरकारकडून मिळणारी दुटप्पी वागणूक संघराज्य व्यवस्थेस हानीकारक आहे.

प्रादेशिक पक्षांचा उदय आणि प्रादेशिक मागण्या :

राजकीय व्यवहार संघीय स्वरूपाचा होण्यासाठी राष्ट्रीय पक्षांनी प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व मान्य करणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवरील प्रश्न व मागण्याकडे राष्ट्रीय पक्ष व नेतृत्व दुर्लक्ष करत असल्याने अनेक ठिकाणी प्रादेशिक पक्षांचा उदय झाला. परंतु राष्ट्रीय पक्ष हे मत्स्यन्यायाप्रमाणे प्रादेशिक पक्षांना गिळंकृत करण्याचा प्रयत्न करत असतात हे संघराज्यासमोरील एक प्रकारचे आव्हानच आहे.

पक्षांतर बंदी कायदा :

पक्षांतर बंदी कायद्याचा गैरवापर करून राज्य सरकारे अस्थिर केली जात आहेत. अनेकवेळा सत्ताधारी पक्ष या कायद्याचा वापर आपल्या राजकीय सोयीसाठी करताना दिसतो. तसेच पक्षांतर बंदी कायद्यानुसार एखाद्या सदस्याला अपात्र ठरविण्याचा अंतिम अधिकार हा संबंधित सभागृहाच्या सभापतींना (स्पीकरला) असतो. इंग्लंडमध्ये स्पीकर म्हणून निवड झाल्यानंतर संबंधित सदस्य आपल्या पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देतात. परंतु भारतामध्ये अशा प्रकारचा राजीनामा देण्याची पद्धत नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचा सभापती या अधिकाराचा गैरवापर करून विरोधी पक्षांच्या सदस्यांना अपात्र ठरवत असल्याचे दिसते. ज्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होते. अन्याय झालेल्या सदस्यांना न्यायालयाकडे दाद मागण्याची वेळ येते आणि संघराज्याच्या संसदीय प्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

राज्यांची घटती स्वायत्तता :

कायदा आणि सुव्यवस्था हा राज्याचा विषय आहे परंतु राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत केंद्र सरकारला हस्तक्षेप करण्याचे विशेष असे अधिकार आहेत. त्या अधिकारांचा वापर करून केंद्र सरकार राज्यांमध्ये केंद्रीय सुरक्षा दलांना राज्यांच्या समंतीशिवाय तैनात करण्यावरून अनेकदा वाद निर्माण झालेले असून त्यामुळे राज्यांच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केंद्र सरकारच्या राज्यातील वाढत्या हस्तक्षेपामुळे व केंद्रीकरणामुळे राज्यांची स्वायत्तता घटत असलेली दिसते. केंद्राने निर्णय प्रक्रियेमध्ये राज्यांना अधिक प्रमाणात समाविष्ट करण्याची गरज आहे तरच सहकारी संघराज्यवाद बळकट होऊ शकेल.

संसदेतील प्रतिनिधित्व :

लोकसंख्या वाढीच्या दरात असलेल्या मोठ्या फरकामुळे राज्यांमध्ये राजकीय प्रतिनिधित्व असंतुलित होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे अनेक राज्यांचे हितसंबंध दुर्लक्षित होऊ शकतात. कारण विशेषत: दक्षिण भारतातील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना केल्या आहेत तर उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. सध्याच्या लोकसभा जागांच्या वाटपात १९७१ च्या जणगणनेनुसार जागा निश्चित केल्या आहेत ज्यामुळे लोकसंख्या नियंत्रणात ठेवलेल्या राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळते. आता २०२७ नंतर होणाऱ्या जनगणनेनंतर परिसीमन आयोग स्थापन होण्याची शक्यता आहे. यामुळे लोकसंख्या जास्त असलेल्या राज्यांना संसदेत अधिक प्रतिनिधित्व मिळेल अशी भीती दक्षिणेकडील राज्यांमध्ये आहे. हा मुद्दा भविष्यात भारताच्या संघराज्यात मोठा तणाव निर्माण करू शकतो.

आर्थिक आव्हाने :-

वित्तीय असमतोल :

संघराज्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे केंद्र व राज्य सरकारमधील आर्थिक अधिकारांचे विभाजन होय. परंतु भारतीय संविधान केंद्र सरकारला महसुलाच्या प्रमुख स्त्रोतांवर लक्षणीय नियंत्रण ठेवण्याची परवानगी देते. त्याचबरोबर केंद्र आणि राज्यांमध्ये आर्थिक संसाधनांचे असमान असे वितरण होत असल्याने राज्यांना विशिष्ट प्रकल्प आणि उपक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही.

कर प्रणाली :

केंद्र सरकार कर महसुलाचा मोठा वाटा नियंत्रित करते तर राज्ये कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठीची मोठी जबाबदारी पार पाडतात. यामुळे अनेकदा राज्यांना आर्थिक मदतीसाठी केंद्रावर अवलंबून राहावे लागते. ज्यांची अर्थव्यवस्था मजबूत आहे अशी विकसित राज्ये ही राष्ट्रीय जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे त्यांच्या असे निदर्शनास येते की जीएसटी प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या कमी विकसित असणाऱ्या राज्यांना जास्त फायदा होतो. त्यामुळे

राज्यांना केंद्रीय निधी वाटण्यासाठी पारदर्शक व वस्तुनिष्ठ सूत्र विकसित करण्याची गरज वाटते. तसेच वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यामुळे राज्यांचा त्यांच्या महसुलावरील अधिकार मर्यादित झाला आहे. राज्यांना आता अनेक करांवर स्वायत्तता राहिलेली नाही ज्यामुळे राज्यांना आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी केंद्रावर अवलंबून रहावे लागते.

अर्थकारणातील राजकीय पक्षपातीपणा :

केंद्र सरकार सत्तेमध्ये सोबत असणाऱ्या पक्षांना विकासासाठी भरीव निधी देत असते. तर विरोधी आघाडीतील पक्षांना मात्र निधीसाठी दुय्यम स्थान देत असते. त्यामुळे भिन्न विचारधारा असणारे पक्ष देखील भरीव निधीसाठी केंद्रातील सत्तेवर असणाऱ्या पक्षाला पाठिंबा देऊन बदल्यात निधी व मंत्रीपदे पदरात पाडून घेत असतात. त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूकदेखील केंद्र सरकार आपल्या पक्षाची सत्ता असणाऱ्या घटक राज्यांमध्ये करत असल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे राज्यांमध्ये सत्तेत असणाऱ्या केंद्र विरोधी आघाडीतील पक्षांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

प्रशासकीय आव्हाने :-

केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर :

१९६३ साली भारतामध्ये सीबीआयची स्थापना निष्पक्ष व जलदगतीने तपास करण्यासाठी झाली. परंतु स्थापनेपासून ते आजपर्यंतचा झालेला या यंत्रणेचा वापर पाहता त्यास विरोधी पक्षांविरोधात वापरले जाणारे राजकीय शस्त्र अशी जनप्रतिमा निर्माण झाली आहे. तसेच ईडी या संस्थेचा वापर सत्तेतील सरकारने अनेकदा विरोधी पक्षाला लक्ष्य करण्यासाठी त्याचबरोबर अनेक राज्यांमधील केंद्रविरोधी सरकारे पाडण्यासाठी या तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचे आरोप अनेक राज्यांनी केला आहे यामुळे केंद्र-राज्य संबंधामध्ये अविश्वास वाढला आहे आणि संघराज्याच्या तत्वांना धक्का बसत आहे.

राष्ट्रपती राजवट :

केंद्र सरकारच्या सल्ल्याने राष्ट्रपती घटक राज्यांमध्ये राज्यपालांची नियुक्ती करतात. त्यामुळे केंद्र सरकारच्या विरोधी आघाडीतील पक्षांची सत्ता असणाऱ्या राज्यांमध्ये राज्यघटनेचे उल्लंघन झाले अथवा राज्य घटनेनुसार कार्य करत नसल्याचे राज्यपाल हे राष्ट्रपतींच्या निर्देशनास आणून देऊन राज्यघटनेतील कलम ३५६ चा गैरवापर करून राष्ट्रपती राजवट म्हणजेच राज्य आणीबाणी लावत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. अशाप्रकारे घडणाऱ्या घटनांमुळे सरकारिया आयोगाने असे सुचविले की जेव्हा सर्व उपलब्ध पर्याय अपयशी ठरतात तेव्हा शेवटचा पर्याय म्हणून अत्यंत प्रकरणांमध्ये राष्ट्रपती राजवट अतिशय संयमाने वापरावी. संघराज्यीय तत्वे आणि आत्म्याचा आदर राखण्यासाठी केंद्राने कलम ३५६ चा अतिरेकी वापर टाळणे आवश्यक आहे.

राज्यपाल आणि राज्य सरकारमधील संघर्ष :

अनेक राज्यांमध्ये विशेषत: जेथे केंद्र आणि राज्यात वेगवेगळ्या पक्षांचे सरकार आहेत तेथे राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यामध्ये सुरु असलेला संघर्ष दिसून येतो. राज्यपाल अनेक विधेयकांना मंजुरी देण्यास विलंब करतात किंवा राज्यसरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करतात असा आरोप केला जातो. राज्यपालांचे पद तटस्थ असले पाहिजे अशी अपेक्षा असताना ते केंद्राचे प्रतिनिधी म्हणून काम करत असल्याचा आरोप अनेक राज्यांनी केला आहे. या केंद्राच्या अप्रत्यक्ष हस्तक्षेपामुळे अनेक वेळा राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष सर्वोच्च न्यायालयातही पोहोचतो.

एप्रिल २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकार विरुद्ध तमिळनाडू राज्यपाल या खटल्यामध्ये राज्यपालांची विधेयकांवरती निर्णय न घेण्याची कृती बेकायदेशीर असल्याचे सांगून कलम १४२ चा वापर करून सर्वोच्च न्यायलयाने अशा प्रलंबित राहिलेल्या सर्व विधेयकांना संमती मिळाल्याचे जाहीर केले. पुंछी आयोगाने राज्यपाल नियुक्तीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी समिती स्थापन करून त्यामध्ये संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याचा समावेश करण्याची शिफारस सुचविली होती.

प्रादेशिक आव्हाने :-

प्रादेशिक अस्मिता :

भारतामध्ये भाषिक, धार्मिक, जातीय तसेच वांशिक विविधता आढळते. त्यामुळे प्रादेशिकदृष्ट्या असमानता दिसून येते. राज्यांराज्यांमध्ये असणाऱ्या भाषिक वादामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक तणाव वाढत आहे. तसेच जातीवर आधारित

आरक्षणासाठी जाती-जातींमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद वाढत चाललेले आहेत. २०२५ मध्ये केंद्र सरकारने घटक राज्यांना विचारात न घेता लादलेल्या भाषिक धोरणाला अनेक राज्यांनी एकत्रित येऊन विरोध दर्शविला होता.

प्रादेशिक असंतोष :

संस्कृतीच्या आणि भाषेच्या आधारावर स्वायत्ततेच्या मागण्यांद्वारे प्रादेशिकता स्वत:ला प्रस्थापित करत असते. अशाप्रकारे राष्ट्राच्या सुरक्षिततेमध्ये अंतर्गत बंडाळीचे आव्हान भेडसावते आणि त्यामुळे भारतीय संघराज्याच्या मूलभूत संकल्पनेत उलथापालथ होताना दिसते. उदाहरणार्थ आसाममधील एक प्रमुख जमात असलेल्या बोडोंची वेगळ्या बोडोलँडची मागणी तसेच पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग टेकड्यांमधील गोरखा समुदायाची वेगळ्या गोरखालँडची मागणी दीर्घकाळापासून आहे. तसेच काही भागामध्ये वेगळ्या राष्ट्राची देखील मागणी केलेली दिसते. उदाहरणार्थ खलिस्तान, द्रविडनाडू यामुळे भारताच्या राष्ट्रीय एकतेला आणि एकात्मतेला आव्हान निर्माण होते.

उत्तर व दक्षिण दरीमुळे विकासावर होणारा परिणाम :

भारतातील उत्तर व दक्षिणेकडील राज्ये यांच्यामध्ये होणारा वाद आणि केंद्र सरकारचा सहभाग हे भारतीय संघराज्याच्या संरचनेतील एक महत्त्वाचे आणि गुंतागुंतीचे वैशिष्टय आहे. तसेच या दोन्ही विभागांमध्ये संसाधनाचे आणि समान संधीचे पारदर्शक वितरण न झाल्याने टोकाचे मतभेद वाढलेले दिसतात. उत्तरप्रदेश, बिहार येथील नागरिकांना रोजगारासाठी महाराष्ट्र, कर्नाटक तसेच गुजरात अशा विकसित राज्यांमध्ये स्थलांतरित व्हावे लागते. परंतु अशा स्थलांतरितांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. नीती आयोगाच्या एस.डी.जी. इंडिया इंडेक्सनुसार केरळ सारखे राज्य शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये उच्च स्थान मिळवते तर बिहार आणि झारखंड सारखी राज्ये लक्षणीयरित्या मागे आहेत. त्यामुळे उत्तर विरुद्ध दक्षिण असे ध्रुवीकरण दिसून येते.

आंतरराज्यीय वाद :

आंतरराज्यीय वाद हे मुख्यत्वे सीमावाद, जलविवाद आणि राजकीय मतभेदांमुळे उद्भवतात. असे वाद राज्यांच्या विकासाला अडथळा आणत आर्थिक आणि सामाजिक संबंधावर नकारात्मक परिणाम करतात. देशाच्या एकात्मतेला एकप्रकारे आव्हान देतात. हे वाद राज्यांच्या निर्मितीतील अस्पष्ट सीमांकन, नैसर्गिक संसाधनांचे असमान वितरण आणि ऐतिहासिक कारणांमुळे देखील निर्माण होतात. त्यापैकी प्रमुख राज्यांमधील वाद पुढीलप्रमाणे तमिळनाडू आणि कर्नाटक यांच्यामध्ये कावेरी नदीच्या पाणी वाटपावरून संघर्ष सुरु आहे. तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद, आसाम-मिझोराम या राज्यातील सीमावाद दीर्घकाळापासून सुरु असल्याचे दिसतो.

वर्चस्वशाली केंद्र सरकार :-

कायदेनिर्मितीचे अधिकार क्षेत्र :

संसद संपूर्ण भारतासाठी आणि राज्यविधिमंडळे त्यांच्या संबंधित राज्यांसाठी कायदे करू शकतात. संविधानाच्या सातव्या अनुसूचीमध्ये संघसूची ज्यामध्ये संसदेला कायदे करण्यासाठी ९७ विषय तर राज्यविधिमंडळांना कायदे करण्यासाठी राज्यसूची ज्यामध्ये ६६ विषय आहेत आणि संसद व राज्यविधिमंडळे दोघेही कायदा करू शकतील अशी ४७ विषयांची समवर्ती सूची आहे. परंतु दोघांनीही एकाच विषयासंबंधित कायदा केल्यास त्यावेळी संसदेचाच कायदा ग्राह्य धरला जातो. तसेच जे विषय वरील तीनही सूचीमध्ये नाहीत अशा विषयांवर कायदा करण्याचा शेषाधिकार हा संसदेला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय हितासाठी किंवा आणीबाणीच्या काळात संसद राज्य सूचीतील विषयांवरदेखील कायदे करू शकते. तसेच राज्यसभेला राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा विशेष अधिकार देखील आहे. यावरून कायदे निर्मितीमध्ये पूर्णत: केंद्रसरकार प्रबळ असल्याचे दिसते.

आंतर-राज्य परिषद :

सरकारिया आयोगाच्या शिफारशीनुसार सरकारने संविधानाच्या कलम २६३ अंतर्गत केंद्र आणि राज्य तसेच आंतर-राज्य वाद सोडविण्यासाठी तसेच समान हिताच्या व चिंतेच्या बाबींवर समन्वय आणि सहकार्य करण्यासाठी आंतर-राज्य परिषद स्थापन केली होती. परंतु १९९० च्या स्थापनेपासून परिषदेची फक्त ११ वेळाच बैठक झाली आहे. तर जुलै २०१६ पासून एकही बैठक झालेली नाही. त्यामुळे अनेक राज्यांचे मुख्यमंत्री बैठक घेण्यासाठी आग्रही आहेत. या बैठकीमुळे केंद्र-राज्य, राज्य-राज्य संबंध सुधारण्यासाठी फायदा होऊ शकतो. त्याचबरोबर या परिषदेला अधिक प्रभावी आणि सक्रिय बनवणे आवश्यक आहे जेणेकरून अनेक संघराज्यीय वाद सामंजस्याने सोडविता येतील.

एक राष्ट्र, एक निवडणूक :

केंद्र सरकारच्या या विधेयकामुळे भारतात एकाचवेळी केंद्रीय व राज्य पातळीवरील निवडणूक पार पाडली जाईल. त्यामुळे राष्ट्रीय पक्ष वगळता इतर प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येईल अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रादेशिक पक्षांनी या प्रस्तावाला विरोध दर्शविण्याचे महत्वाचे कारण म्हणजे ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाहीत. तसेच निवडणूकीमध्ये राष्ट्रीय पक्षांसोबत खर्च आणि राजनीती यामध्ये स्पर्धा करू शकणार नाहीत. आय.डी.एफ.सी. या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार एकत्रित निवडणूकीमुळे ७७ टक्के शक्यता अशी आहे ज्यामध्ये मतदार केंद्रातील व राज्यातील सत्ता एकाच पक्षाकडे देतील. त्यामुळे एक राष्ट्र, एक निवडणूक घेणे हे संघराज्यापुढील समकालीन आव्हान ठरू शकते.

**निष्कर्ष :**

१) परिस्थितीनुरूप आव्हानांमध्ये वाढ झाल्याने संघराज्याचे स्वरूप बदललेले दिसते.

२) संघराज्यामध्ये केंद्र सरकारची वर्चस्वशाली भूमिका दिसून येते.

३) केंद्र सरकार आर्थिक वितरणामध्ये असमान वाटप करताना आढळते.

४) राज्यपालांनी घेतलेली भूमिका अनेकवेळा पक्षपाती असल्याचे दिसून येते.

५) संघराज्यापुढे प्रादेशिक आव्हाने वाढत असल्याचे दिसते.

६) राज्यां-राज्यांतील वाढत्या असमतोलाचा परिणाम संघराज्यावर झालेला दिसतो.

**संदर्भसूची :**

1) Chari Chandra, (1992), 'Federal Concept: The India Experience', Allied Publication, New Delhi.
2) Chatterjee Partha, (2004), 'State and Politics in India', Oxford University Press, Delhi.
3) Constituent Assembly of India Debates, (1948), Volume VII, Retrieved from https://sansad.in/uplods/const_Assmbly-Debates-Volume7-4-November 1948.
4) Sarkaria Commission Report, Retrieved from https:// interstate council. gov. in/report-of-the-sarkaria-commission/
5) One Nation, One Election Report, Retrieved from https:// onoe. gov. in/ HLC-Report-en
6) The Hindu, (2022), Federalism in India An Uneasy balance, Retrieved from https://www.thehindu.com
7) The Hindu, (2024), Reimaging India Federalism, Retrieved from https://www.thehindu.com
8) The Hindu, (2025), Delimitation debate : A Confilict between the principle of democracy and one of federalism, Retrieved from https://www.thehindu.com